अस्सल सोलापुरी
सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

मद्यविक्रीचा बंदीचा आदेश मतदान काळ आणि मतदारसंघापुरता मर्यादित

मुंबई : मद्यविक्रीचा बंदीचा आदेश मतदान काळ आणि मतदारसंघापुरता मर्यादित असल्याचे उच्च न्यायालयाने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. तसेच, याबाबत रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या आदेशात सुधारणा केली आहे.

रायगड जिल्ह्यात रायगड आणि मावळ हे दोनच लोकसभा मतदारसंघ असून दोन्हींसाठी अनक्रमे ७ व १३ मे रोजी मतदान होणार आहे. ही बाब लक्षात घेता कायद्याने दोन्ही मतदारसंघात केवळ मतदानाच्या ४८ तासांच्या आधी आणि मतदान संपेपर्यंत मद्यविक्रीला बदी घालता येऊ शकते. दोन्ही मतदारसंघात वेगवेगळ्या दिवशी मतदान होणार असल्याने जिल्हाधिकारी संपूर्ण जिल्ह्यासाठी ही अट लागू करू शकत नाहीत, असेही न्यायमूर्ती ए. एस. चांदूरकर आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या नवी मुंबई हॉटेल ओनर्स असोसिएशनच्या याचिकेवर निर्णय देताना खंडपीठाने उपरोक्त आदेश दिले. मावळ लोकसभा मतदारसंघात पनवेल, कर्जत आणि उरण या विधानसभा मतदारसंघाचा, तर रायगड लोकसभा मतदारसंघात पेण, अलिबाग, श्रीवर्धन आणि महाड या विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो. परंतु, लोकप्रतिनिधी कायद्याच्या संबंधित कलमाला बगल देऊन रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी संपूर्ण जिल्ह्यात मतदान काळात मद्यविक्रीवर बंदी घालणारा आदेश काढला आहे. औरंगाबाद खंडपीठाने यासंदर्भात दिलेल्या आदेशाचा दाखला याचिकाकर्त्यांनी आदेशात सुधारणा करण्याची मागणी करताना दिला होता.

सिंचन प्रकल्प मार्गी लावण्याला भाजप सरकारचे प्राधान्य : गडकरी

पंढरपूर/प्रतिनिधी

भविष्यात पाणी प्रश्न सगळ्यात महत्वाचा आहे. भाजप सरकारनं मागच्या दहा वर्षात सिंचन प्रकल्पांच्या माध्यमातून याच प्रश्नावर परिणाम काम केलं आहे. येत्या काळातही सिंचन प्रकल्प मार्गी लावण्यालाच या सरकारचं पहिलं प्राधान्य असेल, असे केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सांगतानाच, देशातील शेतकरी हा केवळ अन्नदाता न राहात ऊर्जादाता होण्यासाठी भाजप सरकार मोठं व्हिजन राबवत आहे, असंही ते म्हणाले.

माढा लोकसभेचे महायुतीचे उमेदवार खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर तसेच सोलापूर लोकसभेचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ, आज पंढरपूर येथे आयोजित सभेत गडकरी बोलत होते.

यावेळी व्यासपीठावरआमदार राम सातपुते, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी आमदार प्रशांत परिचारक, आमदार समाधान आवताडे, माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, आमदार गोपीचंद पडळकर, प्रा. शिवाजी सावंत, शिवानंद पाटील, अनिल सावंत, लक्ष्मण पापरकर उपस्थित होते.

यावेळी गडकरी पुढे म्हणाले, आज शेतकरी इथेनॉल तयार करत आहे. ऊर्जा तयार करत आहे. इतर राज्यांमध्येही आपले सरकार विकासाच्या निमित्ताने धोरण तयार करत आहे. विविध प्रकल्प राबवली जात आहेत. त्यामुळे पुढील तरुणाच्या पिढीच्या हाताला काम मिळणार आहे. येत्या काळामध्ये देशाच्या भविष्य बदलणार आहे. बेरोजगारीपासून जनतेला मुक्त करायचं आहे. भविष्यात उपलब्ध होणार आहे. इथेनॉलची इथेनॉलवर चालणारी वाहन इकॉनोमी दोन हजार कोटी करायचा उद्देश आहे, असेही त्यांनी सांगितले.

नाईक-निंबाळकर सातपुतेंचे कौतुक अन् शाबासकी

केंद्रीस मंत्री गडकरी यांनी सभेवेळी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर आणि आमदार राम सातपुते यांचे कौतुक केले. नाईक-निंबाळकरांनी खूप विकास कामं आपल्या मतदार संघात केल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. विकास कामांबद्दल त्यांचं कौतुक केलं. आमदार राम सातपुते हे विद्यार्थी परिषदेतून आलेला सच्चा कार्यकर्ता आहे. मी त्यांना वीस वर्षांपासून ओळखतो. राम सातपुते हा काम करणारा इमानदार कार्यकर्ता आहे. टक्केवारी घेणारा खासदार होणार नाही, असे सांगत नाईक-निंबाळकर आणि सातपुते यांचे कौतुक करत त्यांना शाबासकी दिली.

▶▶ शेतकरी 'ऊर्जादाता' बनविण्याचे व्हिजन
▶▶ मोदींना पंतप्रधान करण्यासाठी आशीर्वाद द्या

अजून काय म्हणाले गडकरी?

- सोलापूर जिल्ह्यात २० हजार कोटींचे बांधले राष्ट्रीय महामार्ग
- कोट्यावधी रुपयांच्या पालखी महामार्गांची भाजप सरकारनं केली उभारणी
- जनावरांसाठी अद्ययावत हॉस्पिटल्स् भविष्यात बांधण्याचे सरकारचे धोरण
- आधुनिक तंत्रज्ञानामुळे साडेतीनशे प्रोजेक्ट देशांमध्ये बनवण्यात येणार
- यामध्ये इथेनॉल इंधन ऊर्जा, दुग्ध उत्पादन, शेतकऱ्यांसाठी उत्तम नर्सरी बनवण्यात येणार
- केवळ स्मार्ट सिटी नसून स्मार्ट व्हिलेजही निर्माण झाले पाहिजेत हे धोरण सरकारचं आहे
- रयतेचे राज्य शिवशाही आणि रामराज्य या देशात आलं पाहिजे हेच भाजपचं उद्दिष्ट
- भाजप व मोदींच्या नेतृत्वावर जनतेला आहे विश्वास
- जनतेच्या अपेक्षा आणि स्वप्न पूर्ण करण्यासाठी मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करा
- सोलापूर व माढ्याच्या लोकसभेच्या उमेदवाराला मतदान करा

पंढरपूरच्या उड्डाणपूलाचा प्रश्न मार्गी लावणार

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेने शहरापासून ग्रामीण भागापर्यंत रस्ते विकास झाला आहे. पंढरपुरातील महत्त्वाचा असलेला रेल्वे उड्डाणपुलाचा निर्णय लवकरच अमलात येईल. उड्डाणपुलाचा प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन नामदार गडकरी यांनी आवर्जून दिले.

रेल्वे स्टेशन परिसरातील खूनाचे गूढ उकलले सदर बझार पोलिसांकडून आरोपीस अटक

सोलापूर/प्रतिनिधी

रेल्वे स्टेशनच्या पाठीमागील बाजुस सिमेंट गोडावून जवळ २६ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास एका व्यक्तिचा खून करण्यात आला होता. या खूनाचे गुढ अखेर सदर बझार पोलिसांनी उकलले आहे. आरोपी गणपत उर्फ सुनिल गायकवाड (रा. पटवर्धन चाळ, रामवाडी) याला अटक केली आहे.

संबंधित खूनप्रकरणात मृताच्या अंगावर जखमा होत्या. त्यावरुन त्या व्यक्तीचा खून झाल्याचे पोलिसांना समजले. पोलिसांनी त्या ८ व्यक्तीबाबत चौकशी केली असता त्याचे नांव संतोष बाबुराव घुमटे (वय ४५ रा. राजेश कोठेनगर, दमानीनगरजवळ) असे असल्याचे समजले. पोलिसांनी त्याच्या नातेवाईकांकडे तपास करुन त्यांना बोलावून घेतले. मृताचा भाऊ विजयकुमार बाबुराव घुमटे (वय ३८ रा. राजेश कोठेनगर) यांनी फिर्याद दिली. यावरून आरोपी विरूध्द खुनाचा गुन्हा दाखल केला. याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर काटे यांच्याकडे आला.

तपासादरम्यान पोलिसांना माहिती मिळाली की, रेल्वे स्टेशन परिसरात मोबाईल चोरीचे गुन्हे करणारा गणपत उर्फ सुनिल गायकवाड यानेच हा खून केला आहे.गुप्त माहिती मिळताच पोलिसांनी सुनिल गायकवाड याचा शोध घेवून त्याला ताब्यात घेतले. तेव्हा त्याने खून केल्याची कबुली दिली. तसेच मृताचा चोरलेला मोबाईलसुध्दा पोलिसांना काढून दिला.

ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त परमार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सागर काटे, गुन्हेशाखेचे फौजदार नितीन शिंदे, सहाय्यक फौजदार अनिता जाधव, हवालदार औदुंबर आटोळे, संतोष मोरे, मुलाणी, चव्हाण, पोलीस नाईक फुटाणे, गायकवाड, बिराजदार, गुंड, पोलीस कॉन्स्टेबल दिंडोरे, पुजारी, आंगुले, राऊत, चालक शेतसंदी यांनी पार पाडली.

उष्माघाताने वळसंग येथील माध्यमिक शिक्षकाचा मृत्यू

सोलापूर/प्रतिनिधी

वळसंग (ता.द.सोलापूर) येथील शंकरलिंग हायस्कूलमधील शिक्षक सुरेश सिद्राया परशेट्टी (वय ५६) यांचा शनिवारी दुपारी उष्माघाताने मृत्यू झाला.

परशेट्टी हे वळसंग येथून शनिवारी दुपारी दुचाकीवर घरी आले. पाणी पिल्यावर त्यांना अस्वस्थ वाटू लागले. तेवढ्यात काही कळण्याअगोदरच ते जमिनीवर कोसळले. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. त्यांचे पार्थिव शवविच्छेदनासाठी सिव्हिल हॉस्पिटलला नेण्यात आले. शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे खरे कारण समजणार आहे.

परशेट्टी यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. ते मुळचे केगाव बु. (ता. अक्कलकोट) येथील रहिवासी आहेत. त्यांची अंत्ययात्रा उद्या (रविवारी) दुपारी १२ वाजता नवीन आरटीओ ऑफिसजवळील बेझूर नगर येथील त्यांच्या राहत्या घरापासून निघणार आहे. अंत्यविधी तुळजापूर वेस येथील लिंगायत स्मशानभूमीत होणार आहेत.

जिल्ह्यात आज प्रचाराची सांगत

सोलापुरात फडणवीस, गडकरींच्या सभा काँग्रेसची निघणार पदयात्रा

सोलापूर/प्रतिनिधी

एकमेकांवर होणारे आरोप-प्रत्यारोप, शाब्दीक हल्ले, सभा, पदयात्रा अशी सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघात उडालेली प्रचाराची राळ रविवारी संपणार आहे. रविवारी शेवट दिवस असल्यामुळे सायंकाळी पाचनंतर प्रचाराच्या तोफा थंडावणार आहेत. शेवट दिवशी सोलापूर लोकसभा मतदारसंघात पंढरपूर येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तर अक्कलकोट येथे वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची सभा होणार आहे. तर दुसरीकडे काँग्रेसने कन्ना चौकातून भव्य पदयात्रेचे आयोजन केले आहे.

सोलापूर लोकसभा मतदारसंघात आता काँग्रेसच्या प्रणिती शिंदे, भाजपचे राम सातपुते यांच्यासह २१ उमेदवार रिंगणात आहेत. माढा लोकसभा मतदारसंघातून भाजपकडून खा. रणजितसिंह नाईक- निंबाळकर, पवार गटाकडून धैर्यशिल मोहिते पाटील वंचितकडून रमेश बारसकर यांच्यासह ३२ उमेदवार निवडणुकीला उभे आहेत.

सोलापूर आणि माढा लोकसभेची निवडणूक रंगतदार अवस्थेत आहे. भाजपकडून आ. राम सातपुते यांच्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नितीन गडकरी, टी. राजा यांच्या सभा झाल्या. काँग्रेसच्या आ. प्रणिती शिंदे यांच्यासाठी खा.राहुल गांधी, उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विश्वजित कदम, सतेज पाटील यांच्या सभा झाल्या. दुसरीकडे माढ्यात खा. निंबाळकर यांच्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीस, रामदास आठवले यांच्या सभा झाल्या तर धैर्यशिल मोहिते पाटील यांच्यासाठी शरद पवार यांनी चार सभा घेतल्या. ७ मे रोजी मतदान होणार आहे. रविवारी सायंकाळी पाच वाजता प्रचाराची सांगता होत आहे.

विदर्भ, मराठवाड्यात उष्णतेच्या झळा, पुढील आठवड्यात पावसाचा इशारा

पुणे : राज्यातील विदर्भ आणि मराठवाड्यात कमाल तापमानात दीड ते दोन अंश सेल्सिअसने वाढ झाली आहे. शनिवारी सर्वाधिक ४४.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद अकोला येथे झाली.

राज्यात शनिवारी विदर्भ आणि मराठवाड्याला उष्णतेच्या झळांचा सामना करावा लागला. राज्यात सर्वाधिक ४४.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद अकोला येथे झाली. त्याखालोखाल अमरावती ४३.८, बुलढाणा ४०.०, चंद्रपूर ४३.८, गडचिरोली, वर्धा आणि वाशिम ४३.० आणि नागपूर येथे ४१.५ अंश तापमान होते.

मराठवाड्यात परभणीत ४३.६, औरंगाबादमध्ये ४१.६, बीडमध्ये ४३.१ अंश तापमान होते. मध्य महाराष्ट्रात सोलापूर ४३.४, सांगली ४१.६, सातारा ४०.९, जळगावात ४२.३ आणि मालेगावात ४२.८ अंश सेल्सिअस तापमान होते. किनारपट्टीवर डहाणूत ३५.८, कुलाब्यात ३३.२ आणि रत्नागिरीत ३३.० अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.

मराठवाड्यात अवकाळी

हवामान विभागाने विदर्भ आणि मराठवाड्यात सोमवारपासून पुढील तीन दिवस अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे.

किराणा दुकानातून तब्बल ४ कोटी ५० लाखांचे ड्रग्ज जप्त

ठाणे : निवडणूक काळात पैसा आणि दारुंचा धुरळा उडत असतो, अनेकदा गावागावात कार्यकर्त्यांच्या पार्ट्यांची मैफील जमत असते. मात्र, निवडणूक काळात पोलीस यंत्रणाहीअतिशय सतर्क असते. त्यामुळेच, अवैध दारुवाहतूक असेल, अमली पदार्थांची वाहतूक असेल किंवा बेहिशोबी मालमत्ता असेल, पोलिसांची करडी नजर असते.

पोलिसांकडून कसोशीने तपासयंत्रणा राबविण्यात येते. मात्र, तरीही गुन्हेगारीच्या घटना उघडकीस येतात.आता, कल्याण क्राईम ब्रांचच्या पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. एका किराणा दुकानातून तब्बल साडे चार कोटी रुपयांचं एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आलं आहे.

या घटनेनं अवैध धंदेवाल्यांमध्ये खळबळ उडाली असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

उल्हासनगर शहरातील हिल लाईन पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या एका किराणा दुकानातून कल्याण गुन्हे शाखेच्या पथकाने साडेचार कोटी रुपयांच्या किमतीचं ड्रग्स जप्त केलं असून ड्रग्स डीलर दुकानदारालाही अटक करण्यात आली आहे. तर, या घटनेमागील मास्टरमाईंड मुख्य ड्रग्स डीलर अद्यापही फरार आहे. दरम्यान, पोलिसांकडून त्याचा शोध घेतला जात असल्याची माहिती देण्यात आली.

अंबरनाथ तालुक्यातील नेवाळी येथील गायत्री किराणा दुकानांमध्ये मोफेड्रॉन एमडी हा अंमली पदार्थ बेकायदेशीररित्या विक्री करत असल्याची माहिती कल्याण क्राईम ब्रँचला खबऱ्याकडून समजली. त्यानंतर, कल्याण क्राईम ब्रँचने तत्काळ या किराणा दुकानात धाड टाकत ३ किलो एमडी जप्त केले, या एमडी ड्रग्जची किंमत ४ कोटी ५२ लाख २९ हजार रुपये एवढी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, कल्याण क्राईम पोलिसांनी आरोपी दुकानदार राजेश कुमार प्रेमचंद तिवारी याला बेड्या ठोकले आहेत. तर, मुख्य आरोपी शैलेंद्र राकेश अहिरवार हा फरार झाला असून पोलिस याचा शोध घेत आहेत. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून मुंबईसह उपनगरातील अंमली पदार्थांच्या घटनांमुळे तरुणाई कोणत्या दिशेला जात आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. कारण, मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ, विशेषत: एमडी मोफेड्रॉन ड्रग्ज जप्त केलं जात आहे.

आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत भविष्य निर्वाह निधीचा अपहार

पुणे : बनावट कागदपत्रांद्वारे ८९ कंपन्यांची स्थापना करून आत्मनिर्भर भारत योजनेतील कामगारांच्या नावे केंद्र शासनाकडून जमा करण्यात आलेला नऊ कोटी ५६ लाख रुपयांच्या भविष्य निर्वाह निधीचा अपहार करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी वानवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ८९ कंपन्यांची स्थापना करण्यासाठी निरनिराळी नावे, पत्ते आणि एकच मोबाइल क्रमांक दिल्याचे आढळून आले आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली आहे.

भविष्य निर्वाह निधी कार्यालयातील अधिकारी मनोजकुमार असरानी (वय ४५) यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. भविष्य निर्वाग निधी कार्यालयाकडून याप्रकरणी अंतर्गत चौकशी सुरू करण्यात आली आहे. वानवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पतंगे यांच्या मार्गदर्शाखाली सहायक पोलीस निरीक्षक दत्तप्रसाद शेंडगे तपास करत आहेत.

भारतीय वायूसेनेच्या वाहनांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात एकजण शहीद

जम्मू काश्मिर/वृत्तसंस्था

जम्मू आणि काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात शनिवारी दहशतवाद्यांनी भारतीय वायुसेनेच्या वाहनांवर गोळीबार केला. या दहशतवादी हल्ल्यात पाच जवान जखमी झाले होते. त्यापैकी एकजण शहीद झाले आहेत. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील सुरनकोट भागातील सनई टॉपकडे वाहने जात असताना सायंकाळी हा हल्ला झाला. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

हल्ल्यानंतर राष्ट्रीय रायफल्सच्या एका तुकडीने परिसरात शोध मोहीम सुरू केली आहे, अशी माहिती एएनआय या वृत्तसंस्थेने दिली आहे. ज्या वाहनांवर हल्ला झाला, त्यांना शाहसीतारजवळील सामान्य परिसरात हवाई तळाच्या आत सुरक्षित ठेवण्यात आले आहे.

या हल्ल्यात सुरुवातीला पाच जवान जखमी झाले होते. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. परंतु, उपचारादरम्यान एका जवानाचा मृत्यू झाला. तर, आणखी एकाची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

एका निवेदनात, आयएएफने म्हटले आहे की, दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत जवानाने प्रत्युत्तर देत गोळीबार केला.

या प्रक्रियेत, पाच खऋ जवानांना गोळ्या लागल्या आणि त्यांना तात्काळ वैद्यकीय उपचारांसाठी जवळच्या लष्करी रुग्णालयात हलवण्यात आले. उपचारादरम्यान एक जवान शहीद झाला. स्थानिक सुरक्षा दलांकडून पुढील कारवाया सुरू आहेत.

राजौरी आणि पुंछ जिल्ह्यांमध्ये पसरलेल्या पीर पंजाल भागात गेल्या दोन आठवड्यांतील हा तिसरा दहशतवादी हल्ला आहे. २२ एप्रिल रोजी थानमंडीच्या शाहद्रा शरीफ भागात अतिरेक्यांनी गोळीबार केल्याने एका ४० वर्षीय गावकऱ्याचा मृत्यू झाला. कुंदा टॉप येथील मोहम्मद रझीक असे या व्यक्तीचे नाव असून त्याचा भाऊ प्रादेशिक सैन्यात जवान असल्याची माहिती आहे. २८ एप्रिल रोजी उधमपूरच्या बसंतगढ भागात मोहम्मद शरीफ या ग्रामरक्षकाची हत्या झाली होती.

२१ डिसेंबर रोजी पुंछमधील देहरा की गली आणि बुफलियाज दरम्यान मुघल रोडवर त्यांच्या ताफ्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात चार जवान शहीद झाले होते. राजौरीतील बाजीमाल जंगलातील धर्मसाल पट्ट्यात मोठ्या तोफांच्या चकमकीत दोन कॅप्टनसह पाच लष्करी जवानांचा मृत्यू झाल्याच्या आठवड्यांनंतर हा हल्ला झाला.

परिसरात आगामी लोकसभा निवडणुका लक्षात घेता, सुरक्षा दल आणि पोलिसांनी दहशतवादी आणि त्यांच्या सहानुभूतींना हुसकावून लावण्यासाठी मोठ्या प्रमाणावर घेराव आणि शोध मोहीम सुरू केली आहे. शाहदरा शरीफ हल्ल्याच्या काही दिवस आधी, पोलीस आणि सुरक्षा दलांनी संयुक्त कारवाईत पूंछच्या हरी बुध्द भागातून एका शाळेच्या मुख्याध्यापकाला अटक केली होती आणि त्याच्या घरातून दारुगोळा आणि दोन चिनी ग्रेनेडसह पाकिस्तान बनावटीचे पिस्तूल जप्त केले होते. .

तिसरा डोळा
– प्रकाश पोरे

आता हा धूर कशाचा?

कल्याण
190-09-469